## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/१२/२०१७

**१) शेतातील धानाच्या पोत्याची चोरी करुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/१२/२०१७ ते १७/१२/२०१७ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दिलीप बिसन चौधरी वय ५० वर्ष, रा. मांढळ याने त्याचे शेतातील धानाचा चुरणा करुन १६ पोते धान शेतावर ठेवले होते त्यापैकी ९ पोते धान वजन ७ क्विंटल किंमती अंदाजे १६०००/–. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) वेल्डींग दुकानातील साहित्यांची चोरी . :–**

दिनांक १६/१२/२०१७ चे १९.०० ते १७/१२/२०१७ चे १०.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संतोष अंबिका सिंह वय ३७ वर्ष, रा. बेला यानी त्याची शिवम वेल्डींग दुकान दिनांक १६/१२/२०१७ ला बंद करुन दिनांक १७/१२/२०१७ ला सकाळी १०.०० वाजता दरम्यान दुकान उघडुन बघीतले तेव्हा यातील अज्ञात चोराने दुकानाचे खिडकीचे लोखंडी रॉड तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील १ नग आरएल २०० ए एमपी २००० इनव्हटर वेल्डींग मशिन, १ नग ब्लेड सायडर, ४, १/२ वेल्डींग रॉड बॉक्स, १ नग २०० ए एमपी इनव्हटर मशिन, ३ नग ड्रील बिट, १४ कटर व्हील बॉक्स, असा एकुण ४०,६००/–रु. चा माल साई प्रसाद हॉटेल समोर बेला येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मॅस्ट्रो स्कुटी चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु व स्वत: जखमी झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/१२/२०१७ चे ०८.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन पायदळ जाणारा मृतक हेमराज जयराम टेंभुर्णे वय ५९ वर्ष, रा. आंबाडी यास धडक मारुन गंभिर दुखापत करुन त्याचे मरणास कारणीभुत होवुन व स्वत: जखमी झाल्याने फिर्यादी रोशन प्रभाकर लिल्हारे वय २३ वर्ष, रा. आंबाडी कॉलोनी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी मेमो वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/१२/२०१७ चे १४.३५ वाजता दरम्यान यातील मृतक वृषभ साजन सत्तेल वय २१ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा याने अती मद्य प्राशन करुन प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे आकस्मीक विभागात आणले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत करुन बॉडी पि. एम करीता मरचुरीत ठेवले आहे. असे डॉक्टरी चे लेखी मेमो प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना पुराम यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) विहीरीचे पाण्यात महिला मृत अवस्थेत मिळुन आली. :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची आई मृतक श्रीमती भुसराबाई परसराम चोले वय ७० वर्ष, रा. पालांदुर ही मागील १ वर्षापासुन बि. पी. चे आजार असल्याने तिच्यावर सरकारी दवाखाना पालांदुर येथे औषधोपचार सुरु होते मृतक ही खाटेवरुन झोपेतुन उठुन घरी कोनाला काही न सांगता निघुन गेली तिचा शोध घेतला असता फिर्यादीला सरकारी विहीरीचे पाण्यात मृतक आईचे प्रेत मृत अवस्थेत तरंगतांना दिसुन आल्याने फिर्यादी राजेश परसराम चोले वय ४० वर्ष, रा. पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**६) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे १०.०० ते १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक पप्पु मधुकर मेंढे वय ३० वर्ष, रा. ढोलसर हा दारुपाणी पिण्याचे सवईचा असल्याने त्याने दारुच्या नशेत घरी स्वयंपाक खोलीचे आळयाला स्वत: दोराने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी शेखर मधुकर मेंढे वय २४ वर्ष, रा. ढोलसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे १०.०० ते १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक नामदेव विठोबा रहीले ५५ वर्ष, रा. चिचोली याची प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे दिनांक १६/१२/२०१७ ला १०.३० वाजता आयसीयु वार्ड येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**८) विहीरीचे पाण्यात तरुणी मृत अवस्थेत मिळुन आली. :—**

दिनांक १६/१२/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील मृतक मुलगी नेहा श्रीलाल लस्करे वय २२ वर्ष, रा. बघेडा ही दिनांक १६/१२/२०१७ ला सायकांळी ०७.३० वा चे दरम्यान शेतातुन कोचईचे पान आणतो म्हणुन घरुन निघुन गेली परंतु घरी परत न आल्याने तिचा शेतात जावुन शोध घेतला असता मृतक ही शेतातील विहीरीचे पाण्यात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी जितेंद्र श्रीलाल लस्करे वय ३५ वर्ष, रा. बघेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**९) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, वरठी, सिहोरा, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३८ लिटर हातभट्टी दारू + २१०० किलो सडवा+ मोही फुल+ साहित्य + १ अॅक्टीवा मोटार सायकल किंमती १,४८,८५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती २४००/–रु. असा एकुण १,५१,२५० /रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०७ केसेस व ईतर वाहनांवरती –७५ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.